# जिभले, तुला काय धंदा ?

लहानपणी आम्ही राहत होतो तिथे बाजूला एक लाकडाची वखार होती. पाठीमागे एक शाळा आणि तिचे छोटेसे मैदान होते. संत गाडगे महाराज कुठूनसे आले आणि तीनचार दिवस त्या शाळेच्या कोपऱ्यात राहिले होते. आम्हा खेळणाऱ्या साऱ्या बारक्यासारक्या पोरांना गोळा करून त्यांनी भजन करायला लावले. त्यातले एक 'गेला गेला जन्म वाया', असे होते. ते घरी येऊन आम्ही म्हणायला लागलो तेव्हा माझी आई आणि शेजारच्या मावशी आम्हाला फार रागावल्या. एवढ्या लहान वयात जन्म वाया गेला असं काय म्हणता आहांत, असे त्यांचे म्हणणे.

पण संध्याकाळी शाळेच्या पटांगणात भजन सुरू झाले. हां हां म्हणता माणसे गोळा झाली. पटांगणच नाही तर लाकडाची वखारही माणसांनी भरून गेली. आम्हाला रागावणाऱ्या आई आणि मावशीही महाराजांच्या कीर्तनाला आल्या. आधी विचित्र वाटणारे महाराजांचे रूप आम्हा पोरांनाही नंतर खूप आवडायला लागले. बाबांनी चला म्हटले असते तर आम्ही काही पोरं त्यांच्याबरोबर गेलोही असतो. श्रोत्यांशी संवाद साधत कीर्तन करण्याची त्यांची पद्धत, अत्यंत साधे राहणे, कमालीचा निरीच्छपणा हे सगळे मनाच्या आत जाऊन कोठेतरी भिडले होते. त्यांनी कीर्तनात म्हटलेले एक भजन अजूनही आठवते.

"जिभले, तुला काय धंदा,
घडीभर भजावे गोविंदा"

जीभ आपल्या आयुष्यात केवढे तरी सुख घेऊन येते. साऱ्या आवडत्या पदार्थांची चव आपल्याला तिच्यामुळेच कळते. इतरांशी भाषेने संवाद साधण्याचंही तेच एक साधन आहे. पण या सुखाची चटकही तीच जीभ लावते. मग नाही नाही ते त्रास आणि मनस्ताप सहन करावे लागतात. रसास्वाद आणि संवाद या दोन्ही बाबतीत जिभेवर नियंत्रण ठेवणे जेवढे अवघड आहे, तेवढेच अत्यावश्यकही आहे.

आपण बहुतेक वेळा पोटासाठी जेवत नाही, तर जिभेचे चोचले पुरविण्यासाठी जेवतो. आपलं खाणं म्हणजे पचनशक्तीची सत्त्वपरीक्षाच होऊन जाते. 'दाखव हे पचवून' असं तिला आव्हान देऊनच आपण खातो. आरोग्यच टिकलं नाही तर शरीर कोणत्याच उपक्रमाला साथ देऊ शकत नाही. संन्याशाला तर औषध समजून आहार सेवन करावा असं सांगितलं आहे. तितक्या थराला नाही गेलं तरी शक्य तितका सात्त्विक आहार ठेवणं चांगलं.

शाब्दिक विचार मनात येतात ते प्रकट करण्याचं काम जीभ करते तेव्हा तर फारच सांभाळून राहायला हवं. कारण जिभेने केलेली जखम जास्त खोलवर जाते. संबंध विनाकारण दुरावतात.

"ऐसी बानी बोलिये, मन का आपा खोय
औरन को सीतल करे, आपहु सीतल होय।"

–भीष्मराज बाम
('मना सज्जना' या पुस्तकातून)